# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.11.2025** **वार- शनिवार**

---

**लोकअदालत**

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय लोकअदालतीचं शनिवारी, 13 डिसेंबरला जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात आयोजन करण्यात येणार आहे. अधिकाधिक पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी केलं आहे.
बाईट

आपली प्रकरणं लोक अदालतीमध्ये तडजोडीकरीता ठेवण्यासाठी नागरिकांनी संबंधीत न्यायालय किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसंच तालुका विधी सेवा समिती इथं संपर्क साधायचा आहे. तसंच पक्षकार त्यांच्या वकिलांची देखील मदत घेऊ शकतात.

**परिषद**

द्वितीय आंतरराष्ट्रिय खरेदीदार-विक्रेता परिषद पुण्यात गेले दोन दिवस उत्साहात पार पडली. महाराष्ट्रातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना जागतिक बाजारपेठेकडं नेणारी ही परिषद प्रभावी माध्यम ठरेल असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ आणि भारत सूक्ष्म उद्योग मंच यांच्याद्वारे संयुक्तपणे, केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या 'रॅम्प' म्हणजेच सूक्ष्म उद्योग कार्यक्षमता वृद्धी आणि गती योजना या उपक्रमांतर्गत ही परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत 16 देशांतील 41 परदेशी खरेदीदार तसंच महाराष्ट्रातील 300 हून अधिक सूक्ष्म आणि लघु उद्योगांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

परिषदेदरम्यान 500 हून अधिक व्यवसायिक बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये उद्योगांमधील सहकार्य, निर्यातवृद्धी, उत्पादन गुणवत्ता, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि नव्या व्यावसायिक संधींवर सखोल विचारविनिमय झाला. महाराष्ट्रातील उद्योजक आणि परदेशी खरेदीदार यांच्यात 32 सामंजस्य करार करण्यात आले.

**पुलं**

पुलंना कलेमागील माणूसही महत्वाचा वाटायचा. आस्वादक वृत्तीला कृतीची जोड देत पुलंनी रसिकता जोपासली अशी भावना ग्लोबल पुलोत्सवात मान्यवर वक्त्यांनी आज पुण्यात व्यक्त केली. 'आस्वादक पुलं' परिसंवादातून पुलंच्या रसिकत्वाचं दर्शन उपस्थित रसिकांना घडविण्यात आलं.

**दंत-करार**

भारतीय दंतचिकित्सा संघटना आणि पुण्यातील औंध इथलं जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्यादरम्यान सुलभ आणि उच्च गुणवत्तापूर्ण मुख आरोग्य सेवेकरिता एक सामंजस्य करार करण्यात आला. असं पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं.
या भागीदारीतून पुण्यात अत्याधुनिक बहुविशिष्ट दंत रुग्णालय आणि संशोधन केंद्र उभारलं जाणार आहे. या केंद्रात गरजू आणि वंचित रुग्णांसाठी आधुनिक दंतउपचार विनामूल्य उपलब्ध करून दिले जातील.

**थकबाकी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पुणे विभागातील अकृषी ग्राहकांची 436 कोटी रुपयांची देयकं थकीत आहेत. थकबाकी वसूल करण्यासाठी उपविभागनिहाय पथकं तयार केली असून, ग्राहकांनीही वर्तमान वीज देयकासह थकबाकी भरून सहकार्य करण्याचं आवाहन ‘महावितरण’च्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केलं आहे.

**बाजार**

बाजार समितीच्या प्रश्नांबाबत 18 नोव्हेंबरला पुण्यात राज्यव्यापी परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पुण्यात व्यापारी परिषदेच्या बैठकीत ठरलेल्या मुद्द्यांचा पाठपुरावा करण्याविषयी आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी या परिषदेत चर्चा होणार आहे.

**क्लायंबिंग**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपळे सौदागरमधील क्लायंबिंग कॉम्प्लेक्समध्ये नुकतीच 'आयएफएससी आशियाई अजिंक्यपद' स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारतानं सात पदकांची कमाई केली.

**वंदेमातरम**

वंदे मातरम् संघटनेच्या चमूकडून जम्मू-काश्मीरमधील जवानांना फराळ वाटप करण्यात आलं. काश्मीरच्या श्रीनगरमधील लाल चौक, हरिसिंग स्ट्रीट, पंचमुखी हनुमान मंदिर यासह सीमेवर तैनात जवानांना दिवाळी फराळ देऊन वंदे मातरम् संघटनेनं देशाचं रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी वंदे मातरम् संघटनेचे प्रदेश अध्यक्ष सचिन जामगे, मोठ्या संख्येनं स्थानिक नागरिक आणि जवान तसंच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात चांगली थंडी जाणवत आहे. आज किमान तापमान 16 अंश सेल्सियस नोंदविण्यात आलं. पुढील काही दिवस तापमान असंच राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**